# क.का. वाघ विद्याभवनचे खो-खो स्पर्धेत सुयश

**निफाड। दि.३ प्रतिनिधी**



कर्मवीर काकासाहेब वाघ विद्याभवनाच्या मैदानावर निफाड तालुकास्तरीय खो-खो स्पर्धा संपन्न झाल्या. त्यात कर्मवीर काकासाहेब वाघ विद्याभवन भाऊसाहेबनगरच्या १४ वर्षीय गटाने तालुक्यातील संघांना नमवित प्रथम क्रमांक मिळविला. अंतिम सामना निफाड इंग्लिश स्कुल निफाड व भाऊसाहेबनगरच्या संघात झाला. यात क.का. वाघ विद्याभवनाच्या संघाने ११ गुणांनी प्रतिस्पर्धी संघावर विजय मिळविला. विजयी संघातुन कप्तान कुणाल महाले, उपकप्तान प्रविण महाले व संघाचे तसेच खो-खो मार्गदर्शक गोविंद कांदळकर यांचे संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ, विश्वस्त काशिनाथ दादा टर्ले, चांगदेवराव होळकर, के.एस. बंदी, विद्याभवनाचे प्राचार्य सी.ए. शेख, गिताई वाघ कन्या विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. पी.डी. रुईकर, बी.डी. मोंढे, बी.एस. तोरवणे, एच.पी. गुरुळे, तालुका क्रिडा केंद्रप्रमुख मधुकर देशमुख व तालुक्यातील क्रिडाशिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, गावकरी यांनी अभिनंदन केले व जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी संघास शुभेच्छा दिल्या. विद्याभवन परिवारात खो-खो स्पर्धेतील हे यश तब्बल १० वर्षानंतर मिळाले म्हणुन परिसरात खो-खो संघाचे विशेष कौतुक केले जात आहे. वरील स्पर्धांचे उद्‌घाटन गटशिक्षणाधिकारी श्रीमती सरोज जगताप यांच्यासह विद्यालयाचे प्राचार्य, गिताई वाघ कन्या विद्यालयाच्या मुख्याध्यापिका, पिंपळस ग्रामपंचायतीचे मान्यवरांसह क्रिडाशिक्षक यांनी केले. पंच म्हणुन गोविंद कांदळकर, डी.के. मोरे, विलास निरभवणे, रमेश सानप, विलास गायकवाड, टी.टी. जाधव, नारायण शिरसाठ यांनी काम पाहिले. याप्रसंगी तालुक्यातील खेळाडु, शिक्षक उपस्थित होते.